# हरविलेल्या व्यक्तीचा शोध

- मिसिंग केस हाताळणाऱ्या तापसी अधिकारी यांनी तात्काळ काय करावे.
- मिसिंगचा तपास करताना काय नियमावली ठरवून देण्यात आली आहे.

१. प्रत्येक मिळून आलेले किंवा पोलीसांनी ताब्यात घेतलेले मुल याचा फोटो घेणे.

२. असे हरविलेले बालक मिळून आले नंतर चे फोटो हे वेबसाईट www.trackthemissingchild.gov.in , वर्तमान पत्र आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे विस्तुत प्रमाणात पाठविले पाहिजे आणि ते कोठे मिळून आले आहे याबाबत देखील वेबसाईट www.trackthemissingchild.gov.in या वेबसाईटवर कळविली पाहिजे.

३. चाईल्ड  वेलफेअर कमेटी (C.W.C.) समोर बालक  मिळून आल्या पासून २४ तासाचे आत पुढील कार्यवाही साठी हजर केले पाहिजे.

४. मिळून आलेल्या बालकांची तपासी अधिकारी यांनी तात्काळ

पो. ठा. दैनंदिनी मध्ये नोंद घेतली पाहिजे. संबंधित संस्था नियंत्रक कक्ष यांना माहिती दिली पाहिजे.

५. मिळून आलेल्या मुलाची वैद्यकीय तपासणी करणे.

६. मुलास मानसिक दृष्टया कोणत्या प्रकारची मदत हवी काय याबाबत मूल्यमापन केले पाहिजे.

७. चाईल्ड वेलफेअर  कमेटी द्वारे बालक त्याचे पालक / आईवडिलांकडे सोपविणे.

८. तपासी अधिकारी यांनी विविध प्रकारचे पैलू मधून तपास व तशी तक्रार दाखल करून सखोल तपास केला पाहिजे.

९. मिळून आलेल्या बालकांसंबंधी तपासी अधिकारी यांनी बालकाचे अपहरण मानवी व्यापारासाठी केले होते याबाबत तपास करणे.

१०. बालकांचे लैंगिक दृष्ट्या शोषण झाले काय बाबत तपास करणे. त्याबाबत (C.W.C.) संस्थाना कळविणे.

१1. मिळून आलेल्या बालकाला पो. ठाण्यात कोणत्याही परिस्थितीत स्थानबद्ध करून ठेऊ नये.

१२. मिळून आलेल्या बालकांचे जबाब नोंद करणे. त्यावेळी जिल्हा बालक संरक्षण अधिकारी किंवा एन. जी. ओ . हजर ठेवले पाहिजे.

१३. जबाब साध्या गणवेशात नोंद करावा.

१४. तपास करते वेळी किंवा जबाब नोंद करते वेळी पीडित बालकाचा व आरोपीचा संपर्क येणार नाही याची काळजी घेणे.

**१५.** येणाऱ्या तक्रारी बाबत किंवा तपास करते वेळी तपासी अधिकारी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचे वतीने नेमण्यात आलेले अधिकारी यांची मदत ते घेऊ शकतात.